निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २५५ वा.
बुधवार :१९ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


## छत्रपती संभाजीनगरमध्ये शंभर 'पे अॅण्ड यूज' शौचालये उभारण्याचे नियोजन - सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई प्रतिनिधी**/ छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या आणि महत्वाच्या ठिकाणी शौचालयांची कमतरता लक्षात घेता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शंभर 'पे अॅण्ड यूज' सार्वजनिक शौचालये उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या शौचालयांच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी स्थानिक सफाई कर्मचाऱ्यांकडे देण्यात येणार आहे. यामुळे सफाई कर्मचाऱ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होणार असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रात पे अॅण्ड यूज १०० नवीन शौचालय उपलब्ध करून देण्याबाबत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस दूरदृश्यप्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त जी. श्रीकांत, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक बाबासाहेब बेलदार, सामाजिक न्याय विभागाच्या उपसचिव वर्षा देशमुख, तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, छत्रपती संभाजीनगर शहराची लोकसंख्या वेगाने वाढत असून, वाढत्या लोकसंख्येला अनुरूप स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक झाले आहे.

विशेषतः बाजारपेठा, बसस्थानके, गर्दीच्या वसाहती, पर्यटनस्थळे, सार्वजनिक रस्ते व प्रमुख चौकांमध्ये शौचालयांची कमतरता जाणवते. राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्तीय विकास महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा उद्देश शहरी वसाहतींमध्ये स्वच्छता सुविधा निर्माण करणे, सफाई कामगारांचे जीवनमान उंचावणे आणि नागरी सुविधांची उपलब्धता वाढवणे हा आहे.




छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील १०० लाभार्थ्यांना शौचालय बांधणीकरिता महानगरपालिकेतर्फे जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून आवश्यक निधी राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्तीय विकासच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ही शौचालये महिला, पुरुष आणि दिव्यांगांसाठी वेगळ्या सुविधा असलेली, पाण्याची उपलब्धता, विद्युत व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था व नियमित साफसफाई यांसह प्री-फॅब्रिकेटेड/मॉड्यूलर तंत्रज्ञानावर आधारित असणार आहे. हा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

## प्रतिबंधित पदार्थ वापरणाऱ्यांवर कठोर कारवाई - अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

**मुंबई**/ आरोग्याला घातक असलेल्या प्रतिबंधित पदार्थांचा वापर आणि अशा पदार्थांची विक्री रोखण्यासाठी सतर्क रहावे, तसेच असे प्रकार आढळल्यास कठोर कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.



मंत्रालयात अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली अन्न व औषध प्रशासन विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी आयुक्त श्रीधर डुबे पाटील, सहआयुक्त (दक्षता) डॉ.राहुल खाडे, सहआयुक्त (अन्न) मंगेश माने उपस्थित होते.

अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले, प्रतिबंधित असलेल्या गुटखा व तत्सम पदार्थांची विक्री शाळा अथवा कोणत्याही परिसरात होणार नाही याची दक्षता संबंधित कार्यक्षेत्राच्या अधिकाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे.

या दृष्टीने वेळोवेळी काटेकोर अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. अधिकारी यासंदर्भात अक्षम ठरल्यास त्यांच्यावर कारवाई केली ,जाईल असे अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ म्हणाले.

नागरिकांना स्वच्छ आणि सकस आहार मिळावा तसेच उपहारगृह व हॉटेलच्या ठिकाणी अधिक चांगले वातावरण राहावे. या दृष्टीने लवकरच राज्यात अभियान राबविण्यात येणार असून यामध्ये चांगले काम करणाऱ्यांना गौरवण्यात येईल. यासाठी शहरांसह ग्रामीण भागात तालुकास्तरावर देखील नियोजन केले जावे. या दृष्टीने विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री झिरवाळ यांनी दिले.

## महाराष्ट्रात निवडणुकीच्या मतदानाआधीच भाजपचा पहिला मोठा विजय! बिनविरोध निवड झालेला महाराष्ट्रातील पहिला नगराध्यक्ष

**धुळे** / महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य निवडणुकांची रणधुमाळी पहायला मिळत आहे. नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांची जोरदार तयारी सुरु आहे. २ डिसेंबरला नगर परिषद आणि नगर पंचायतींसाठी मतदान घेतलं जाणार आहे. तर ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या मतदानाआधीच भाजपने पहिला मोठा विजय मिळवला आहे. भाजपचा पहिला नगराध्यक्ष बिनविरोध निवडून आला आहे.

राज्यात पालिका निवडणुकीत भाजपने खातं उघडल आहे. धुळे जिल्ह्यात नगरपालिका निवडणुकीत भाजपने खात उघडलं आहे. धुळ्यातील दोंडाईचा पालिकेत नगराध्यक्ष पदाचा पाहिला निकाल भाजपाच्या बाजुने लागला आहे. दोंडाईचा नगर पालिका नगराध्यक्ष पदी भाजपाच्या नयनकुवर रावल यांची बिनविरोध निवड झाली आहे. दोंडाईचा येथे विरोधी उमेदवार शरयू भावसार यांचा उमेदवारी अर्ज बाद झाल्याने रावल यांची बिनविरोध निवड झाली. २६ पैकी ७ नगरसेवकही बिनविरोध निवडले गेले आहेत. खांदेशात भाजपाची विजयी सुरुवात झाल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष पहायला मिळत आहे.




दोंडाईचा नगरपरिषदेचा मालमत्ता कर थकवल्याच्या मुद्द्यावरून भाजपाचे डॉ. रवींद्र देशमुख यांनी हरकत घेतली होती. सुनावणीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी छाळणी अंती उमेदवारी अर्ज बाद ठरवला. दोंडाईचा नगर परिषदेच्या भाजपच्या नगराध्यक्ष पदी नयनकुवर रावल यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. राज्याचे राज्य शिष्टाचार आणि प्रधानमंत्री जयकुमार रावल यांच्या आई नयन कुवर रावल बिनविरोध निवडून आल्या आहेत. नगराध्यक्ष पदासाठी एकमेव उमेदवारी अर्ज राहिल्याने नयनकुवर रावल बिनविरोध निवडूण आल्या आहेत. याची अधिकृत घोषणा बाकी आहे.

## कृत्रिमरित्या फळे-पिकविण्यावर निर्बंध; नियमबाह्य पद्धतींवर कारवाई करण्यात येणार - अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

**मुंबई**/ कृत्रिमरित्या फळे व भाज्या पिकविण्यासाठी नियमबाह्य पद्धतींचा वापर होऊ नये यासाठी तपासणी करण्यात यावी तसेच अवैध प्रकारांवर कारवाई करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.

यासंदर्भात सहकार व पणन विभागाच्या अखत्यारीतील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आणि त्यांच्या अंतर्गत असलेल्या फळ व्यापाऱ्यांना फळे पिकविण्याच्या शास्त्रीय पद्धतींबाबत कार्यशाळांद्वारे मार्गदर्शन व जनजागृती करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांनी दिले.

मंत्रालयात सहकार, पणन आणि अन्न औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी विभागाचे आयुक्त श्रीधर डुबे-पाटील, सहसचिव रा. को. धनावडे, सहआयुक्त मंगेश माने, तसेच सहकार व पणन विभागाच्या उपसचिव माधवी शिंदे उपस्थित होत्या.



बेकायदेशीर रसायने किंवा गॅस वापरून फळे कृत्रिमरीत्या पिकविण्याचे प्रकार आढळल्यास अन्न सुरक्षा मानके कायदा (एफएसएसएआय) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येत आहे. एप्रिल २०२४ ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान आंबा, केळी आणि इतर फळांचे एकूण १२८ नमुने तपासणीसाठी घेतले असून त्यापैकी १०४ नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत. २४ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत, अशी माहिती बैठकीत विभागाकडून देण्यात आली,

अन्न सुरक्षा मानके नियम २०११ मधील नियमन २.३.५ नुसार फळे कृत्रिमरित्या पिकविण्यासाठी कार्बाईड गॅसचा वापर पूर्णपणे प्रतिबंधित आहे. ऑगस्ट २०१६ मधील दुरुस्तीनुसार १०० पीपीएम तीव्रतेपर्यंत इथिलिन गॅसचा वापर करण्यास मर्यादित परवानगी देण्यात आली आहे.

यावेळी विभागाचे सहायक आयुक्त महाले, कक्ष अधिकारी अजित जगताप उपस्थित होते.

## इपॉज मशीन ला रेंज नाही या कारणाने रेशन वाटप बंद!

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी /बबन उदावंत /**
पैठण मध्ये इपॉज मशीन करत नाही काम रेशन दुकानदार झालेत जाम नागरिक आहे हैराण पैठण येथील नगरपरिषद निवडणुकीचे वातावरण चालु जावे लागते व रेशन घेण्यासाठी इपॉज मशीन चे कारण सांगून रिटन पाठवले जाते.

तर नगर परिषद निवडणुकीत दंग असलेल्या अधिकाऱ्यांचे लक्षात ही बाब कशी येत नाही ही दहा तारखेला वाटप चालु झाली पाहिजेत परंतु आज



असतानी सर्व सामान्य जनतेस रॅशन दुकानदार हे सर्व सामान्य जनतेस इपॉज मशीन चालत नाही सर्व्हर डाऊन असे संगण्यात येत आहे नगरपरिषद निवडणुकीत दंग झालेले अधिकारी वर्गाच्या लक्षात कसे येत नाही अशी चर्चा जोर धरू लागली नागरूकांना रोजीरोटी करिता शेतकरी वर्ग असल्या कारणाने शेतमजुरी करण्याकरिता सकाळी शेतावरती अकोणवीस तारीख असून सुद्धा नागरिकांना रेशन भेटले नाही तर कधीतरी असे होते कि कोणाला दोन ते तीन महिने झाले तरी रेशन भेटत नाही या कारणामुळे काहीतरी मार्ग काढण्यात यावा व रेशन हे वाटप करण्याचे नियोजन लावावे रेशन न मिळाल्याने जनतेमध्ये नाराजीचे वातावरन निर्माण झाले आहे .

## खुलताबाद नगरपरिषद निवडणुकीत छाननीत नगराध्यक्ष पदाचे एक अर्ज अवैध...

### नगरपरिषद निवडणूक नामनिर्देशनपत्रांची छाननी प्रक्रियात १२ नगराध्यक्ष पदाचे अर्ज वैध नगरसेवक पदाचे उमेदवार ८५ अर्ज वैध

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी** / खुलताबाद नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर आज, १८ नोव्हेंबर रोजी उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची छाननी प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी स्वरूप कंकाळ, सहायक निवडणुक निर्णय अधिकारी शेख समीर यांच्या उपस्थितीत पार पडली. छाननी प्रक्रियेत नगराध्यक्ष पदासाठी एकूण १२ इच्छुक उमेदवारांकडून १६ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली होती. छाननी अंती १२ उमेदवारांची १५ नामनिर्देशनपत्रे वैध ठरली असून एक नामनिर्देशनपत्र अपात्र ठरविण्यात आले आहे.

दरम्यान, नगरसेवक पदासाठी १०० इच्छुकांकडून तब्बल १२६ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली होती. छाननी प्रक्रियेत ८५ उमेदवारांची १०३ नामनिर्देशनपत्रे वैध ठरली तर १५ उमेदवारांची २३ नामनिर्देशनपत्रे अपात्र ठरली आहेत.

अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी स्वरूप कंकाळ यांनी दिली. दरम्यान, छाननी प्रक्रिया पूर्ण होताच खुलताबादमधील सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांच्या प्रचार योजना अधिक जोरात सुरू केल्या आहेत.




स्थानिक पातळीवर बैठका, घराघरांत संपर्क मोहीमा आणि मतदारांशी थेट संवाद साधण्याची धडपड वाढली आहे.

प्रत्येक पक्षाने ताकदीनिशी रिंगणात उतरण्याची तयारी करत राजकीय वातावरण निर्मिती करण्याचे सुरुवात केली आहे निवडणुकीची चुरस आणखी तीव्र केली आहे.

# महान पंतप्रधान इंदिरा गांधी - भारताचा अभिमान, धैर्य, दूरदृष्टी आणि अदम्य नेतृत्व यांचे प्रतीक....

आज त्यांच्या १०८व्या जयंतीनिमित्त त्यांच्या संपूर्ण कार्याचा, व्यक्तिमत्त्वाचा आणि भारतासाठीच्या योगदानाचा व्यापक आढावा घेताना त्यांचे जीवन किती बहुआयामी होते, हे ठळकपणे जाणवते.

### बालपण आणि स्वातंत्र्यलढ्यातील संस्कार

१९ नोव्हेंबर १९१७ रोजी अलाहाबाद (प्रयागराज) येथे जन्मलेल्या इंदिरा प्रियदर्शिनी नेहरू या अगदी लहानपणापासून देशभक्तीच्या वातावरणात वाढल्या. त्यांच्या घरातील प्रत्येक श्वासात स्वातंत्र्यलढ्याचे विचार रुजलेले होते.

मोतीलाल नेहरू आणि जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली घरात सतत चालणाऱ्या राजकीय चर्चांमुळे इंदिरांच्या मनात देशासाठीची जागृती लहानपणापासूनच निर्माण झाली.

त्यांनी विदेशी खेळणी आणि कपड्यांची होळी केली.

वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी 'वानरसेना' स्थापन करून स्वातंत्र्यलढ्यातील संदेश पोहोचवणे, मिरवणुका काढणे, घोषणा देणे असे काम केले.

हीच त्यांची पहिली सामाजिक आणि राजकीय शाळा होती.

### शिक्षण, कष्ट आणि वैयक्तिक आयुष्यातील संघर्ष

इंदिरा गांधींचे प्राथमिक शिक्षण अलाहाबाद, पुणे येथे झाले. नंतर त्या शांतिनिकेतनमध्ये रवींद्रनाथ टागोरांच्या मार्गदर्शनाखाली शिकण्यासाठी गेल्या. कलाविष्कार, शिस्त, चिंतनशक्ती यांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक परिपूर्ण झाले.

१९३६ साली आई कमला नेहरू यांच्या निधनाने त्या खूप खचल्या, पण वडील जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना परदेशात शिक्षणासाठी पाठवले. तिथे त्यांना जागतिक राजकारणाची विस्तृत दृष्टी मिळाली.

**१९४२ साली त्यांनी फिरोज गांधी यांच्याशी विवाह केला. दोघांनी मिळून स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. पुढे तसेच राजीव आणि संजय या दोन मुलांचे संगोपनही त्यांनी जबाबदारीने केले.**

### राजकारणात प्रवेश - संघर्षातून शिखरापर्यंत

इंदिरा गांधी १९५९ साली काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा झाल्या. याच काळात त्यांचे संघटन कौशल्य, लोकांशी संवाद, ठाम धोरणे यांचा ठसा उमटू लागला.

लाल बहादूर शास्त्री यांच्या निधनानंतर १९६६ मध्ये त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. त्यावेळी देशात दुष्काळ, आर्थिक संकट, बाह्य धोके असे कठीण वातावरण होते.

तरीही त्यांनी धाडसाने निर्णय घेत देशाला स्थिर ठेवले.

आर्थिक आणि सामाजिक धोरणे : एक क्रांती

### त्यांच्या कारभाराचा एक निर्णायक टप्पा म्हणजे- १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण

हा निर्णय भारताच्या अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारा ठरला.

तसेच-

* संस्थानिकांचे प्रिव्ही पर्स रद्द
* गरिबी हटाव मोहिम
* हरित क्रांतीला चालना
* उद्योगविकास आणि स्वयंपूर्णतेवर भर

या सर्वांचा परिणाम म्हणून भारताच्या आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडले.

१९७१ चे युद्ध आणि बांगलादेशाचा जन्म

हे त्यांच्या नेतृत्वाचे सर्वोच्च शिखर मानले जाते.

पश्चिम पाकिस्तानाच्या हल्ल्यानंतर त्यांनी दाखवलेले धैर्य, मुत्सद्देगिरी, लष्करी दूरदृष्टी विलक्षण होती.

* एक कोटी निर्वासितांचे ओझे
* अमेरिकेच्या ७व्या ताफ्याचा दबाव
* आंतरराष्ट्रीय कूटनीतीचा ताण

या सर्वांना तोंड देऊन त्यांनी भारताचे नेतृत्व केले आणि अखेर बांगलादेश निर्माण झाला.

जगाने त्यांना आयरन लेडी म्हणून गौरवले.

दुर्गेसमान नेतृत्व

विरोधी पक्षनेते अटल बिहारी वाजपेयी यांनीही त्यांना दुर्गेची उपमा दिली.

कारण-

* संकटसमयी संयम
* निर्णयात ठामपणा
* विरोधकांच्या दबावाला न जुमानता निर्णयक्षमता

हे सर्व त्यांच्या नेतृत्वाची ओळख झाली.

### अणुशक्ती आणि राष्ट्रीय सुरक्षेतील योगदान

१९७४ साली पोखरण येथे केलेल्या अणुचाचणीने भारत जगातील अणुशक्ती राष्ट्रांच्या यादीत दाखल झाला. हा निर्णय भारताच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ऐतिहासिक ठरला.

सिक्कीमचे भारतात विलिनीकरण (१९७५) हा देखील फार धाडसी आणि दूरदर्शी पाऊल होता.

ऑपरेशन ब्ल्यू स्टार आणि बलिदान

१९८४ साली सुवर्ण मंदिरात बळेबाज अतिरेकी ठाण मांडून बसले होते. त्यांच्या कारवायांमुळे देशाच्या अखंडतेला धोका निर्माण झाला होता. देशहितासाठी ऑपरेशन ब्ल्यू स्टारचा निर्णय घेताना त्यांना काय धोका आहे, हे त्यांना पूर्ण जाणवत होते.

पण देशासाठी त्यांनी त्याचा स्वीकार केला.

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी स्वतःच्या अंगरक्षकांनी केलेल्या हल्ल्यात त्यांनी प्राणार्पण केले.

त्यांच्या मृत्यूने जगात शोकसागर पसरला.

अविस्मरणीय वारसा

इंदिरा गांधी म्हणजे-

* धाडसाचा पर्वत
* निर्णयशक्तीचे सामर्थ्य
* जनतेसाठी अखंड झटणारी नेता
* भारताला नवी ओळख देणारी दूरदर्शी राज्यकर्ती

आजही त्यांचे कार्य इतिहासातील सुवर्णपानांवर कोरलेले आहे.

त्यांच्या जयंतीनिमित्त भावपूर्ण अभिवादन

भारताच्या अखंडतेसाठी, सार्वभौमत्वासाठी आणि विकासासाठी हौतात्म्य पत्करलेल्या पंतप्रधान इंदिरा गांधींना आज त्यांच्या जयंतीदिनी विनम्र, भावपूर्ण अभिवादन!

त्यांचे जीवन प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणेचा झरा आहे.

# मेळघाटमधील कुपोषणामुळे मृत्यूंचे वाढते प्रमाण - गंभीर आणि चिंताजनक!

मेळघाटातील कुपोषणग्रस्त भागाकडे राज्य सरकारने गंभीरपणे दुर्लक्ष केल्याचा मुद्दा मुंबई उच्च न्यायालयाने कठोर शब्दांत अधोरेखित केला आहे.

आदिवासीबहुल मेळघाट परिसरात कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूंचा वाढता आकडा भयावह असून १२ नोव्हेंबर २०२५ रोजी न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त केला. सरकारच्या बेजबाबदार भूमिकेवर न्यायालयाने स्पष्ट फटकार दिली. जून २०२५ पासून आतापर्यंत **शून्य ते सहा महिन्यांच्या वयोगटातील तब्बल ६५ बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू** झाल्याची नोंद न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने केली. हा प्रकार अत्यंत चिंताजनक असून राज्याने तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याची स्पष्ट टिप्पणी न्यायालयाने नोंदवली.

महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर असल्याचे जरी सांगितले जात असले तरी मेळघाटासारखे अती दुर्गम भाग अजूनही अत्यंत मागासलेले आहेत. वाढत्या बालमृत्यूंच्या घटनांवरून या भागातील खऱ्या विकासाची स्थिती उघड होते.

राज्य सरकारने या भागाकडे 'डोळ्यात तेल घालून' लक्ष देण्याची वेळ आली आहे.

अमरावती जिल्ह्यातील या अत्यंत दुर्गम मेळघाटात कुपोषणाबरोबरच गर्भवती व स्तनपान करणाऱ्या मातांच्या मृत्यूंची संख्या वाढत असल्याचे मुद्दे विविध जनहित याचिकांद्वारे न्यायालयाच्या निदर्शनास आले आहेत. सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नावर राज्य सरकार गंभीर नसल्याची तिखट टिप्पणी न्यायालयाने व्यक्त केली.

सरकार विविध योजना राबवते; परंतु मेळघाट, डिंडोरी, नक्सलग्रस्त भाग किंवा इतर दुर्गम पट्ट्यांमध्ये या योजना पोहोचत नाहीत.

अनेक दशकांपासून विविध सरकारे आली-गेली, पण अति दुर्गम भागाकडे राजकीय नेतृत्वाने सातत्याने दुर्लक्षच केले. त्याचे दुष्परिणाम आजही आदिवासी समाजाला भोगावे लागत आहेत. देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली, तरीही अनेक गावांमध्ये प्राथमिक आरोग्य सुविधा नाहीत. रुग्णांना पायपेट्या करून, डोंगर-दऱ्या ओलांडून, कधी झोळीच्या आधाराने मैलोनमैल चालत रुग्णालयात जावे लागते. शिक्षणासाठीही विद्यार्थ्यांना कठोर संघर्ष करावा लागतो. ही परिस्थिती चिंताजनक असून ती भारतातील विकासचित्रावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करते.

दुर्गम भागात नियुक्त केलेल्या डॉक्टरांना प्रोत्साहन मिळावे, योग्य पायाभूत सुविधा उभाराव्यात, सरकारी यंत्रणेला उत्तरदायी बनवावे-हे उपाय तातडीने राबवण्याची गरज आहे. अन्यथा मेळघाटातील कुपोषणाचे चक्र थांबणे कठीण आहे. राजकीय पुढारी या भागाकडे दुर्लक्ष करतात, कारण येथे राजकीय गणिताला अपेक्षित लाभ मिळत नाही-हा आरोपही काही अंशी योग्य ठरतो. परंतु या दुर्लक्षाची किंमत मात्र निरपराध बालकांना जीव देऊन चुकवावी लागते, ही अत्यंत वेदनादायी बाब आहे.

अत्यंत दुर्दैवी सत्य म्हणजे- सरकार सार्वजनिक आरोग्याचा मुद्दा अजूनही हलक्यात घेत आहे. विशेषतः आदिवासी भागात हा प्रश्न अधिक गंभीर आहे. मेळघाटासारख्या अति दुर्गम भागातील नागरिकांना न्याय मिळण्यासाठी, त्यांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी सरकारने तातडीने प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे.

**जय हिंद.**

**- लेखक : रमेश कृष्णराव लांजेवार**

# पुरुषांच्या निःशब्द संघर्षांचा समाजशास्त्रीय मागोवा

१९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा 'आंतरराष्ट्रीय पुरुष दिन' हा केवळ एका लिंगाच्या गौरवाचा दिवस नसून, पुरुषांनी समाजात निभावलेल्या विविध भूमिका, त्यांचे योगदान, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यांच्यावर होणाऱ्या अदृश्य सामाजिक दाबांविषयी गंभीर आत्मचिंतन करण्याची संधी उपलब्ध करून देणारा दिवस आहे. स्त्रियांप्रमाणेच पुरुष देखील संवेदनशील, भावनिक, कधी कमकुवत तर कधी अत्यंत सहनशील असतात; परंतु सामाजिक रचनेच्या पायामध्ये रुतलेली 'पुरुष म्हणजे बलाढ्य, कणखर, भावनाशून्य' ही गुंतागुंतीची प्रतिमा पुरुषांच्या अनेक समस्यांना गडद सावलीतच ठेवते. या न बोलल्या जाणाऱ्या संघर्षांमध्ये 'कामाच्या ठिकाणी पुरुषांवर होणारे खोटे आरोप' ही अत्यंत गंभीर आणि वाढत चाललेली समस्या आहे, जी पुरुषांच्या मानसिक आरोग्याला, कामाच्या सुरक्षिततेला, प्रतिष्ठेला आणि एकूण सामाजिक जीवनाला खोलवर बाधा पोहोचवते. या मुद्द्यावर वस्तुनिष्ठ, संतुलित आणि समाजशास्त्रीय नजरेतून विचार करणे आवश्यक आहे.

कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूक, वाईट वर्तणूक, नैतिक अध:पतन, अन्यायकारक वागणूक किंवा सत्ता शक्ती संबंधित प्रश्नांची तक्रार करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि स्त्रियांना वंचिततेच्या इतिहासामुळे कायदेशीर संरक्षणाची गरज देखील उद्भवते. परंतु संरक्षणाची रचना जेव्हा पक्षपाती समजुतींनी किंवा चुकीच्या वापरामुळे बिघडते, तेव्हा ती पुरुषांसाठी निःशब्द आपत्ती ठरू शकते. अनेक पुरुषांना कोणताही सबळ पुरावा नसताना आरोप झाल्यास ताबडतोब दोषी ठरवले जाते, चौकशी होण्यापूर्वीच त्यांच्या प्रतिमेवर बाजारातील धूळ उडते, नोकरीवर परिणाम होतो तर कधी वैयक्तिक आयुष्यही उद्ध्वस्त होते. खोटे आरोप हा स्त्री-पुरुष संघर्षाचा विषय नसून 'लिंगभाव रूढीवादा''शी संबंधित सामाजिक समस्या आहे हे वारंवार अधोरेखित करणे आवश्यक आहे.

भारतीय समाजरचना पितृसत्ताक असली तरी त्यातील भूमिका आणि अपेक्षा अत्यंत गुंतागुंतीच्या आहेत. पितृसत्तेला पुरुषांचे विशेषाधिकार म्हणून पाहिले जाते, परंतु त्याच प्रणालीच्या दबावाखाली पुरुषांवर 'कुटुंबाचा भार पेलणारा', 'आर्थिक आधार', 'शक्तिशाली संरक्षक' अशी सामाजिक अपेक्षा लादली गेली आहे. या चौकटीमुळे पुरुषांना मानसिक तणाव, भावनिक कोंडी, नैराश्य यांसारख्या समस्यांकडे स्वाभाविकपणे दुर्लक्ष करावे लागते. खोट्या आरोपांचे संकट हेही या दबावाशी जोडलेले आहे, कारण समाज सामान्यतः पुरुष म्हणजे दोषी असू शकतो या पितृतुल्य पूर्वग्रहातून प्रकरणांकडे पाहतो. यामुळे पुरुषांना स्वतःच्या निष्पापतेसाठी लढताना देखील अपराधीपणाचा कलंक सहन करावा लागतो.

कामाच्या ठिकाणचा सामाजिक स्तरिकरणाचा सिद्धांत सांगतो की शक्ती, श्रेणी, अधिकार आणि संसाधनांचे वितरण हे नेहमीच संघर्ष निर्माण करणारे असते. जेव्हा स्त्रियांना न्याय संरक्षणासाठी विशेष कायदे निर्माण केले गेले, तेव्हा त्या कायद्यांचा उद्देश अत्यंत योग्य होता. परंतु शक्तीचा *गैरवापर* हा सार्वत्रिक मानवी गुण असल्याने त्याचा वापर कोणत्याही लिंगाकडून चुकीच्या पद्धतीने केला जाऊ शकतो. अलीकडील काळात अधिकारसंपन्न पदांवरील वाद, बढतीच्या प्रक्रिया, वैयक्तिक वाद, कार्यस्थळातील स्पर्धात्मक मानसिकता किंवा एखाद्या पुरुषाची प्रतिमा खराब करण्यासाठीही खोट्या आरोपांचा वापर होत असल्याचे विविध अभ्यास, संस्थात्मक अहवाल आणि न्यायालयीन प्रकरणे दाखवतात. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर खोटे आरोप हे केवळ व्यक्तीगत वाद नसून स्वतंत्र ओळखीच्या संघर्षाचे, सत्तेच्या असमतोलाचे आणि संस्थात्मक रचनेतील त्रुटींचे प्रतिबिंब आहे.

पुरुषांवरील खोट्या आरोपांचा परिणाम शारीरिक नसला तरी मानसिकदृष्ट्या अत्यंत भयंकर असतो. पहिला आघात म्हणजे 'प्रतिष्ठेची हत्या', कारण समाजातील लोक आरोप झालेल्या पुरुषाकडे 'सत्य उलगडण्यापूर्वीच' संशयाने पाहतात. दुसरा परिणाम म्हणजे रोजगार हरवण्याची भीती. अनेक कंपन्या प्रकरणाचे सत्य समजून घेण्यापूर्वीच कर्मचाऱ्याला निलंबित करतात. काही वेळेस पुरुष आरोपी निष्पाप असल्याचे सिद्ध झाले तरी त्याच्या परत येण्याने सहकाऱ्यांमध्ये निर्माण झालेली दूरी, संशय, कुजबुज आणि तिरस्काराची भावना कायमच राहते. तिसरा आणि सर्वात खोलवर परिणाम म्हणजे मानसिक आरोग्याचा ऱ्हास होय. नैराश्य, असहायता, आत्मदोष, भीती, राग आणि कधी कधी आत्महत्येच्या विचारांपर्यंत परिस्थिती पोहोचते. संशोधन दर्शवते की प्रतिष्ठा आणि रोजगार या दोन गोष्टी पुरुषांच्या आत्मसन्मानाशी घट्ट निगडित असतात; आणि जेव्हा दोन्ही गोष्टी ढवळून निघतात तेव्हा व्यक्तीची मानसिक रचना उद्ध्वस्त होते.

समाजशास्त्रीय सिद्धांतांनुसार, कोणत्याही समाजात न्यायव्यवस्था ही तटस्थ असली पाहिजे; परंतु जेव्हा कायदे एका लिंगासाठीच संरक्षक आणि दुसऱ्यासाठी संभाव्य आरोपीचे स्थान निर्माण करतात, तेव्हा न्यायसंगततेचा समतोल ढासळण्याची शक्यता वाढते. पुरुषांविरोधातील खोटे आरोप हा स्त्रियांना दिलेल्या संरक्षणाचा विरोध नाही, तर त्या संरक्षणाचा निष्पक्ष वापर व्हावा यासाठीचा आग्रह आहे. उघड चर्चा टाळली जाते कारण अनेकांना भीती वाटते की पुरुषांवरील अन्यायाचा मुद्दा उपस्थित केला तर स्त्रियांच्या अधिकारवाढीच्या चळवळीला विरोध केल्याचा ठपका बसू शकतो. परंतु सामाजिक वास्तव हे कधीच एकतर्फी नसते. प्रत्येक समस्येचे अनेक थर असतात, आणि 'लिंगभाव न्याय' म्हणजे एका लिंगाचा विजय नव्हे तर दोन्ही लिंगांना न्याय देणारी समतोल प्रणाली होय.

कामाच्या ठिकाणी खोट्या आरोपांमुळे निर्माण होणारे सामाजिक वर्तुळसुद्धा महत्त्वाचे आहे. एक आरोप एखाद्या पुरुषाला केवळ आरोपी बनवत नाही, तर त्याच्या कुटुंबालाही सामाजिक नजरेत संशयास्पद बनवतो. पुरुषांच्या पत्नी, मुलं, आई-वडील या सगळ्यांना समाजाच्या प्रश्नांना उत्तर द्यावे लागते. या परिस्थितीमधून उभा राहणारा सामाजिक ताण हा लिंगनिर्भर नसून कौटुंबिक ताण असतो. आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पहिल्यास संस्थात्मक आरोप, न्यायप्रक्रियेतील विलंब, संस्थात्मक अविश्वास आणि सार्वजनिक प्रतिषेध हे सर्व त्या कुटुंबाच्या सामाजिक भांडवलावर गदा आणतात.

या समस्येचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे 'पुरुषांची शांतता' होय. पुरुषांना त्यांच्या समस्या बोलून दाखवण्यास समाज परवानगीच देत नाही. तू पुरुष आहेस, तग धरा, काही नाही होत अशाने, तुझ्यावर कोण विश्वास ठेवेल? अशा सामाजिक अपेक्षा पुरुषांच्या तोंडावरच कुलूप लावतात.

पुरुषांच्या समस्यांसाठी समर्पित मानसिक आरोग्य सेवा, समुपदेशन केंद्रे, कायदेशीर मार्गदर्शन संस्था किंवा समता मंच अत्यल्प आहेत. कारण समाजाने पुरुषांना कधीही 'पीडित' म्हणून पाहिलंच नाही. अशा परिस्थितीत खोट्या आरोपांचा मुद्दा हा केवळ कायदेशीर विषय राहत नाही; तो सामाजिक चेतनेचा, भावनिक न्यायाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रश्न ठरतो.

आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहिले तरी विविध देशांमध्ये 'पुरुषांचे हक्क' किंवा 'लिंगभाव तटस्थ कायदे' यांविषयी चर्चा वाढत आहे. अनेक विकसनशील आणि विकसित देशांमध्ये कायदे लिंगभाव निरपेक्ष करण्याची मागणी वाढत चालली आहे, कारण वास्तव असे आहे की 'अन्याय हा स्त्री-पुरुष दोघांवरही होऊ शकतो'. कार्यस्थळातील तक्रार निवारण समित्यांनीही दोन्ही बाजूंची बाजू निष्पक्षपणे ऐकून निर्णय देण्याची गरज आहे. 'सिद्ध होईपर्यंत दोषी' अशी प्रतिकूल न्यायसंस्कृती पुरुषांमध्ये फोफावू नये. आरोप योग्य असल्यास कडक कारवाई व्हावी, पण आरोप खोटे असल्यास तितक्याच कठोरपणे त्या गैरवापराचीही दखल घेतली जावी, हेच न्यायाचे संतुलन असावे.

या सर्व विचारांमधून उलगडते की पुरुषांवरील खोट्या आरोपांचा प्रश्न हा केवळ काहींना भेडसावणारी समस्या नाही; ती 'समाजाच्या समतोलाच्या आणि न्यायव्यवस्थेच्या गुणवत्तेच्या' मापदंडाकडे बोट दाखवते.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा उद्देश पुरुषांचे गौरवगान करणे नसून त्यांच्या निःशब्द संघर्षांना समाजाच्या केंद्रस्थानी आणणे हा आहे. पुरुषांनी कमकुवत होण्यास किंवा वेदना व्यक्त करण्यास कोणतीही लाज वाटू देऊ नये; समाजानेही पुरुषांच्या वेदनांना समजून घेण्याचा मानवी दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.

१९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय पुरुष दिवसाच्या निमित्ताने, समाज म्हणून आपल्याला हे मान्य करावे लागेल की 'जेंडर जस्टिस म्हणजे दोन्ही बाजूंच्या वेदनांना समान न्याय देणे होय'. स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठीचे कायदे महत्त्वाचे आहेत, पण त्याचबरोबर पुरुषांना खोट्या आरोपांपासून संरक्षण देणारी संवेदनशील आणि तटस्थ चौकट उभी करण्याची गरजही तेवढीच मोठी आहे. नातेसंबंध, कार्यसंस्कृती आणि समाजव्यवस्था एका लिंगाच्या आधारावर नव्हे तर मानवी मूल्यांच्या आधारावर उभी राहिली पाहिजे. पुरुषांचे योगदान, त्यांची सहनशीलता, त्यांचे मानसिक संघर्ष आणि त्यांच्यावर होणारे संभाव्य अन्याय हे सर्व समाजाच्या अभ्यासाचा, चर्चेचा आणि धोरणनिर्मितीचा विषय बनले पाहिजे.

एक संतुलित, न्याय्य आणि मानवी मूल्यांनी युक्त समाज निर्माण करण्यासाठी पुरुष आणि स्त्रियांमध्ये संघर्ष नव्हे तर संवाद आवश्यक आहे. खोटे आरोप हा संवाद तोडणारा घटक आहे आणि त्यामुळेच त्यावर चर्चेची गरज अधिक महत्वपूर्ण ठरते. पुरुषांच्या निःशब्द संघर्षांना आवाज देणे म्हणजे स्त्रीहिताच्या विरोधात जाणे नव्हे, तर न्यायाच्या तत्त्वांना उंचावणे आहे. कारण जिथे न्याय सर्वांसाठी आहे, तिथेच समाज अधिक समतोल, संवेदनशील आणि प्रगतिशील होऊ शकतो.

**- डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# आर्यिका तिर्थश्री माताजी यांचे धर्मतिर्थ क्षेत्रावर समाधीमरण देहावसन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी** - शहरापासुन जवळच असेलेले ३० कि.मी. अंतरावरील धर्मतिर्थ क्षेत्र येथे प.पु.आचार्य गुप्तीनंदीजी गुरैदेव ससंघ यांच्या मार्गदर्शनामध्ये व क्षुल्लक शांतीगुप्तजी महाराज व क्षुल्लिका धन्यश्री माताजी यांच्या सानिध्यात आचार्य गुप्तीनंदी गुरैदेव यांची शिष्या आर्यिका तिर्थश्री माताजी वय ८९ यांची यमसल्लेखना पुर्वक दिनांक १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता समाधीमरण झाले. आर्यिका तिर्थश्री माताजी यांचा जन्म १३/०२/१९३६ साली झाला होता. त्यांची क्षुल्लिका दिक्षा २९सप्टेंबर २०१७ रोजी झाली होती. तसेच आर्यिका दिक्षा दिनांक ०८/११/२०२५ रोजी त्यांना आर्यिका दिक्षा देण्यात आली होती.

माताजींचे पुर्वाश्रमीचे नांव सुलोचना बाबुसा साहुजी हे होते त्या छत्रपती संभाजीनगर येथील हडको येथील रहिवासी होत्या. त्या अंत्यंत्य धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. यावेळी आचार्य गुप्तीनंदी गुरैदेव यांनी झुम ॲपच्या माध्यमाने श्रध्दांजली दिली व समाधीमरण ला उदबोधन दिले. या प्रसंगी आर्यिका तिर्थश्री माताजी यांना अग्नीसंस्कार देण्याचे सौभाग्य भास्कर गव्हणे यांना लाभले. यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन धर्मतिर्थ क्षेत्राचे अध्यक्ष चंद्रशेखर पाटणी यांनी केले. यावेळी माताजींना विमान दांडी धरणे, अग्नी हंडी, चंदन लकडी भेट, चंदन पावडर, पुष्पवर्षा, कपुर भेट, घी भेट, प्रथम श्रीफळ, प्रथम समिधा, माळ, अर्चना फळ, शांतीधारा, सुगंधीत कलस, आरती, सफेद चंदन, लाल चंदन, कुंकुम, हळदी, चार कळस, सर्व औषधी, दही, दुध, इक्शु रस आदी रसांनी अभिषेक करैन त्यांना अग्नी संस्कार देण्यात आले. यावेळी अध्यक्ष चंद्रशेखर पाटणी, वरीष्ठ उपाध्यक्ष संजय पापडीवाल, उपाध्यक्ष राजेंद्र पाटणी,महामंत्री पवन पापडीवाल, शरद जालनापुरकर, महावीर ठोले, रमन साहुजी, वज्रु साहुजी, विव्रैम साहुजी, मदनलाल कासलीवाल, संतोष कासलीवाल, प्रेमचंद कासलीवाल, निखील कासलीवाल, डॉ.सुमित काला, किरण मास्ट, प्रेरमचंद साहुजी, किशोर महाजन, जितेंद्र साहुजी, लोकेश साहुजी, शांतीलाल साहुजी, राहुल साहुजी, मदन साहुजी, ललीता साहुजी, वैभव साहुजी, सुशिला साहुजी, दिलीप साहुजी, प्रमोद साहुजी, निलेश साहुजी, इंद्रकुमार सिंगलकर, आयुरा साहुजी, कचंनबाई साहुजी, नितीन नखाते, स्वप्नील साहुजी, राजेंद्र पाटणी, शरद जालनापुरकर, आदींच्या वतीने आर्यिका तिर्थश्री माताजी यांना अभिषेक करण्यात आला.

यावेळी आचार्य गुप्तीनंदी गुरैदेव यांनी मंत्रोपचार व शांतीधारेचे पठण केले. यावेळी छत्रपती संभाजीनगर, देउैळगांवराजा, अंबड, जालना, परभणी, वाळुज, सिडको, कचनेर, पैठण, आडुळ आदी ठिकाणाहुन हजोरो भक्तगण उपस्थित होते अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिलि



# संक्षिप्त

## अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीकासाठी राज्यस्तरीय स्पर्धा जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ राज्यात पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी विभागामार्फत अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीक स्पर्धा सन २०२५-२६ जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेअंतर्गत रब्बी हंगामातील रब्बी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पाच पिकांसाठी स्पर्धा घेतली जाणार असुन, अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५ आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पिक स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

विविध भागांमध्ये शेतक-यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने व नवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन दरवर्षी राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येते.

पीक निहाय (प्रत्येक पीकासाठी स्वतंत्र) सर्वसाधारण गटासाठी ३०० रूपये व आदिवासी गटासाठी १५० रूपये शुल्क राहील. स्पर्धेच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या ु. ज्ञीळीहळ.ारहरीरीहींीर.सीं.ळप या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय तसेच आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहनही कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता(प्रगती) अभियान व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३० नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धे'साठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा या योजनेत जास्तीत जास्त शासकीय कार्यालये, संस्था, अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासकीय गतिमानता आणि लोककेंद्री शासनासाठी केलेल्या उत्कृष्ट कामांसाठी हा पुरस्कार दिला जातो. 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धेशी संबंधित सर्व अनुषंगिक माहितीसाठी pragatiabhiyan.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

दैनिक आत्ताच एक्सप्रेस
**CHANGE OF NAME**
My Change Of Name
Old Name
My Name: **Chate Kanchan Pasharathrao**
Spouse Name: **Sukanya Kanchan Chate**
New Name
My Name: **Chate Kanchankumar Pasharathrao**
Spouse Name: **Shivkanya kanchankumar Chate**

दैनिक आत्ताच एक्सप्रेस
**CHANGE OF NAME**
My change of Name
Old Name
My Name: **Chate Siddhant Kanchan**
Father Name: **Kanchan Pasharathrao Chate**
Mother Name: **Shivkanya Kanchan Chate**
New Name
My Name: **Chate Siddhant Kanchankumar**
Father Name: **Kanchankumar Pasharathrao Chate**
Mother Name: **Shivkanya Kanchankumar Chate**

दैनिक आत्ताच एक्सप्रेस
**CHANGE OF NAME**
My Change Of Name
Old Name
My Name: **Chate Nikita Kanchan**
Father Name: **Kanchan Dasharathrao Chate**
Mother Name: **Shivkanya Kanchan Chate**
New Name
My Name: **Chate Nikita Kanchankumar**
Father Name : **Kanchankumar Dasharathrao Chate**
Mother Name: **Shivkanya Kanchankumar Chate**

दैनिक आत्ताच एक्सप्रेस
**CHANGE OF NAME**
My Change of Name
Old Name
My Name: **Chate Shivkanya Kanchan**
Spouse Name: **Kanchan Pasharathrao Chate**
New Name
My Name: **Chate Shivkanya Kanchankumar**
Spouse Name: **Kanchankumar Pasharathrao Chate**

# प्रभाग क्र. ७ मध्ये जनतेचा विश्वास जिंकणारी उमेदवारी!

# अनंता कुमावत आणि गजाला परवीन पठाण यांचा उमेदवारी अर्ज दाखल




**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर प्रतिनिधी / सुभान शहा**/ दिनांक १६ नोव्हेंबर रोजी गंगापूर नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ७ साठी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार म्हणून अनंता कुमावत आणि गजाला परवीन परवेज पठाण यांनी नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.

प्रभागातील आगामी निवडणुकीची चर्चा रंगात असताना, जनतेच्या मनात विश्वासाने घोळण-ारी दोन नावे म्हणजे-अनंता कुमावत आणि गजाला परवीन पठाण. प्रामाणिकपणा, सेवाभाव आणि सर्वांगीण विकास या तीन भक्कम आधारस्तंभांवर उभी असलेली त्यांची उमेदवारी प्रभागातील सर्वसामान्य नागरिकांसाठी आशेचा नवा किरण ठरत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या दोन्ही उमेदवारांनी सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकासाठी समान न्याय, सुविधा आणि विकास यांना अग्रक्रम दिला आहे. पाणीपुरवठ्यासाठी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा, संकटाच्या प्रसंगी नागरिकांच्या सोबत धाव घेण-ारी सेवा आणि विविध उपक्रमांमुळे त्यांनी प्रभागातील जनतेच्या मनात विश्वासाचे दृढ स्थान निर्माण केले आहे.

उमेदवारांचा प्रभाग विकासाचा दृष्टीकोन स्पष्ट असून, त्यात-

* मूलभूत सुविधांची शंभर टक्के पूर्तता,
* महिला व युवकांसाठी नव्या संधी,
* स्वच्छ व सुरक्षित प्रभागाची उभारणी,
* नागरिकांशी सातत्यपूर्ण संवादातून तातडीने समस्या निवारण

या मुद्द्यांना विशेष प्राधान्य दिले जाणार आहे.

अनंता कुमावत यांची विनम्रता, नागरिकांशी जिव्हाळ्याचा संवाद आणि सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी तत्परतेने पुढाकार घेण्याची वृत्ती यामुळे प्रभागातील लोकांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक भावना अधिक दृढ झाली आहे.

नगरसेवक पदावर निवडून आल्यास प्रभागाचा सर्वांगीण चे-हरा बदलण्यासाठी संपूर्ण योगदान देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# प्रमाणित बियाणे वितरण बाबीमध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड जिल्ह्यांकरीता लक्षांक प्राप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान कडधान्य व तृणधान्य सन २०२५-२६ अंतर्गत प्रमाणित बियाणे वितरण बाबीमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातील तीनही जिल्ह्यांकरीता लक्षांक प्राप्त आहे. पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी व बियाणे बदलाचे महत्व विचारात घेता सुधारित, संकरीत वाणांच्या प्रसाराच्या दृष्टीने जिल्हानिहाय व पीकनिहाय प्रमाणित बियाणे वितरणाचे लक्षांक प्राप्त झाले आहेत.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान कडधान्य अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी हरभरा पीकासाठी १० वर्षाआतील प्रमाणित बियाणे वितरण अनुदान ५० रू. प्रति किलो नुसार ७४० असा राहील. जालना जिल्ह्यासाठी ९५०, तर बीड जिल्ह्यासाठी १६४० याप्रमाणे एकूण ३३३० असणार आहे. तर १० वर्षावरील प्रमाणित बियाणे वितरण अनुदान २५ रु. प्रति किलोनुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी ७९९, जालना जिल्ह्यासाठी २४७२ तर बीड जिल्ह्यासाठी १५८४ या प्रमाणे एकूण ४८५५ असणार आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान तृणधान्य अंतर्गत रब्बी ज्वारी पीकासाठी १० वर्षा आ-तील प्रमाणित बियाणे वितरण अनुदान ३० रु. प्रति किलोनुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी १४०, जालना जिल्ह्यासाठी २७० तर बीड जिल्ह्यासाठी ५२० असे एकूण ९३० असणार आहे. तर १० वर्षावरील प्रमाणित बियाणे वितरण अनुदान १५ रु. प्रति किलो प्रमाणे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी ३७०, जालना जिल्ह्यासाठी ७०० तर बीड जिल्ह्यासाठी १३५० असे एकूण २४२० असणार आहे.

प्रमाणित बियाणे वितरण घटकांतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्याच्या अटी व शर्ती

घटकांतर्गत आर्थिक सहाय्य प्रति शेतकरी कमाल १ हेक्टरपर्यंत मर्यादित आहे.

शेतकऱ्यास महाबिज, राष्ट्रीय बीज निगम, कृभको इ. बियाणे पुरवठादार संस्थेच्या वितरकामार्फत सातबारा उताऱ्याच्या आधारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्व-ावर प्रमाणित बियाणे वितरण करणाऱ्या संबंधित संस्थांमार्फत बियाणे वितरण करण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हातील शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या तालुका कृषी अधिकारी, कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा, असे आव-ाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

# दहिगाव येथे सुविधांचा भयंकर अभावामुळे मुळे स्मशानभूमीची दयनीय अवस्था प्रेत रस्त्यावर जळण्याची वेळ...

### संरक्षणभिंत उभारणे स्मशानभूमी परिसराची स्वच्छता व्यवस्था निर्माण वेळोवेळी पत्र देऊन शासनाचे दुर्लक्ष

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम**/ कन्नड तालुक्यातील दहिगाव येथील स्मशानभूमीची परिस्थिती दिवसेंदिवस अधिक भयावह होत चालली आहे. मूलभूत सुविधा तर दूरच, पण किमान स्वच्छता आणि सुरक्षिततेची सोयदेखील नसल्याने ग्रामस्थांना त्यांच्या प्रियजनांच्या अंत्यविधीसाठी अक्षरशः अमानुष परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.




स्मशानभूमीत बसण्यासाठी बाके नाहीत, संरक्षणभिंत नाही, छायेसाठी शेड नाही-अशा परिस्थितीत अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना उन्हात, वाऱ्यात, पावसात उभे राहून विधी करणे भाग पडते. ग्रामस्थांच्या वेदना ऐकूनही प्रशासन मात्र कानाडोळा करत असल्याची भावना येथे निर्माण झाली आहे. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच भीषण होते. परिसर चिखलात होरपळतो, पाणी साचते, रस्ता वाहून जातो आणि स्मशानभूमी वापरण्यायोग्यच राहत नाही. अनेकदा मृतदेह पा-वसात स्मशानभूमीत नेणेच शक्य नसल्याने प्रेत रस्त्यालगतच जाळण्याची वेळ येते-ही वास्तव परिस्थिती ग्रामस्थांनी दुःखाने सांगितली. ग्रामस्थांचे प्रशासकांकडे वारंवार निवेदन, मागण्या आणि तक्रारी करूनही अद्याप कुठलाही ठोस पुढाकार घे-तलेला नाही.

ग्रामस्थांचा ठाम आग्रह आहे की,संरक्षणभिंत उभारणे

**स्मशानभूमी परिसराची स्वच्छता व्यवस्था बसण्यासाठी बाके व शेडची उभारणी**

या अत्यावश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात.

ग्रामस्थांचे म्हणणे अत्यंत भावनिक पण वास्तववादी आहे :

स्मशानभूमी ही केवळ जागा नाही, ती शेवटचा निरोप देण्याची पवित्र जागा आहे. इथे तरी मूलभूत सुविधांची उपेक्षा होऊ नये.

दहिगावच्या स्मशानभूमीची ही अवस्था प्रशासनाच्या निष्क्रियतेची जिवंत साक्ष देत आहे. आता तरी प्रशासन जागे होऊन मानवी दृष्टिकोनातून तातडीने उपाययोजना करणार का, हा प्रश्न नागरिकांना भेडसावत आहे.

# मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशीची शिक्षा द्या. ..

## शिल्लेगाव पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांना दिले निवेदन....

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर प्रतिनिधी गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन** :- नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील मौजे डोंगराळे येथील चार वर्षीय बालिका यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर तेथीलच एका नराधमाने निर्गुण अत्याचार करून नंतर तिची हत्या केली या अश्लघ्य प्रकाराचा निषेध म्हणून व झालेल्या घटनेची जलदगती न्यायालय मार्फत सुनावणी करून एसआयटी स्थापन करावी आणि घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ शोधून त्यांच्यावरती पॉस्को अंतर्गत गुन्हे दाखल करून अटक करावी या मागणीसाठी लास-ुर स्टेशन येथील सकल सुवर्णकार समाजासह सामाजिक कार्यकर्ते यांच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा गृहमंत्री यांना शिल्लेगाव पोलीस ठाणे मार्फत निवेदन देण्यात आले. शासनातर्फे सदर निवेदन शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पो-लीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी स्वीकारले व योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.




झालेली घटना माणुसकीला काळीमा फासणारी असून चिमुकली यज्ञा ही फक्त सुवर्णकार समाजाची कन्या नसून ती महाराष्ट्र कन्या आहे व नराधम हा शिक्षेला पात्र आहे त्याला फाशीची शिक्षा व्हावी अशी भावना यावेळी पत्रकार मधुकर दंडगव्हाळ यांनी व्यक्त केली. याप्रसंगी स्थानिक अध्यक्ष प्रितेश छाजेड, सचिव लक्ष्मीकांत बनसोड, सदस्य सुधर्मा बिरारी,शुभम बनसोड,सागर बिरारी, योगेश जोजारे, भरत वडनेरे, गणेश बनस-ोड, भिकाजी साखरकर गजानन वाडेकर गणेश जाधव धीरज अंबिलवादे सुन-ील बनसोड धनंजय साळुंखे रोहित ठोळे,कपिल वर्मा,दीपक वर्मा,संजय वर्मा,सागर वर्मा, मधुकर दंडगव्हाळ, प्रशांत दाभाडे, रितेश चंडालिया, अनिल वर्मा, कार्तिक अधिकार, राजेंद्र अधिकार, अमोल चिंतामणी, कुणाल वाघ, आकाश भगुरे,अनुप चिंतामणी, गणेश वर्मा, वैभव अंबिलवादे, कृष्णा बनसोड,वंचित बहुजन आघाडी जिल्हा संघटक संदीप गायकवाड आदींची उपस्थिती होती...

**मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे मन सुन्न करणारी घटना घडली असून प्राथमिक माहितीच्या आधारे एका ४ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून नंतर तिचा दगडाने ठेचून खून केल्याची घटना उघडकीस आल्याने संतप्त नागरिकांनी, नातेवाईकांनी मालेगाव सामान्य रुग्णालयात एकच गर्दी करत आक्रोश केला की सदर आरोपीला फाशीची शिक्षा द्या अशी मागणी केली. घटनास्थळी मालेगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलिस अधिकारी कर्मचारी यांनी पोहचून एका विजय खैरनार नामक संशयित आरोपीला अटक केली आहे...**

# दहिगाव येथील सुखदेव मनगटे यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम**/ कन्नड तालुक्यातील दहिगाव येथील



कै सुकदेव भिवसन मनगटे यांचे सोमवारी रात्री ९ वाजता दुखत निधन झाले.त्यांच्यावर मंगळवारी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले व त्याच्या पश्चात पत्नी पाच मुली तिन मुले सुना नातवंड जवाई असा परिवार असुन बाळु समाधान नारायण यांचे वडील होत .

## संक्षिप्त

# पदवीधर मतदारसंघासाठी सुधारित कार्यक्रम जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ उपसचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी यांनी पदवीधर मतदार संघाच्या मतदार नोंदणीसाठी नमुना क्र.१८ च्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी तारीख वाढवून देण्यात आली असून सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानूसार हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई दि.२८ नोव्हेंबर २०२५, प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी दि.३ डिसेंबर २०२५, दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी दि.३ ते १८ डिसेंबर २०२५ राहील. दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार व छपाई  दि.५ जानेवारी २०२६ रोजी करण्यात येईल. तसेच यादीची अंतिम प्रसिध्दी १२ जानेवारी २०२६ रोजी करण्यात येईल. अशी माहिती प्र.उप जिल्हा निवडणूक अधिकारी सुकेशिनी कांबळे-पगारे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# खिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या महाराष्ट्र संघटकपदी विकासकुमार बागडी



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघच्या महाराष्ट्र संघटकपदी जालना येथील जालना समाचारचे संपादक  विकासकुमार बागडी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची ही नियुक्ती अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा राष्ट्रीय संघटक  कैलास देशमुख यांनी एका नियुक्तीपत्रकाव्दारे केली आहे. विकासकुमार बागडी हे मागील २८ वर्षापासून पत्रकारीता क्षेत्रात आहे. ते   पत्रकारांचे विविध प्रश्न व हितासाठी  काम करीत असून, त्यांच्या या कार्याची दखल घेवून त्यांना महाराष्ट्र संघटकपदाची जवाबदारी देण्यात आली आहे. आगामी काळात पत्रकारांची एकजुट करण्यासह त्यांच्या हितासाठी  काम करणार असल्याची ग्वाही नुतन महाराष्ट्र संघटक विकासकुमार बागडी यांनी दिली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसूफखान पठाण, केंद्रीय नियोजन समिती अध्यक्ष सुरेश सवळे, राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, राष्ट्रीय महासचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश महिला मंच सरचिटणीस कांचनताई मुरके , तसेच जिल्ह्याचे जेष्ठ पत्रकार, संपादक, जिल्हा प्रतिनिधी, उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ता आदिंनी अभिनंदन केले आहे.

# विद्यार्थांमध्ये रमल्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल राजेगाव शाळेतील विद्यार्थांचा जिल्हाधिकारी यांनी घेतला वर्ग



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ सदस्थितीत जिल्हात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची अंमलबजावणी सुरू असून यातंर्गत आज दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घनसावंगी तालुक्यातील राजेगाव शाळेस भेट देवून विद्यार्थांशी संवाद साधला व मुलांचा अभ्यास देखील घेतला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेगाव येथील परिसराची जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पाहणी केली व नंतर त्यांनी आठवीच्या वर्गात जाऊन मुलांना स्वतः गणित विषयाची उदा-हरणे दिली व सोडविण्यासाठी सांगितले.

मुलांनी जिल्हाधिकारी यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. मुलांची गुणवत्ता बघून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व मुलांचे व शाळेचे कौतुक केले.

यावेळी त्यांनी राजेगाव येथील ग्राम पंचायत, मंदिर तसेच गावाची पाहणी केली. यावेळी उप जिल्हाधिकारी सामान्य प्रशासन श्रीमती नम्रता चाटे, उपविभागीय अधिकारी अंबड  उमाकांत पारधी, तहसीलदार घनसावंगी वंजारी मॅडम नायब तहसीलदार इथापे, ग्रामसेवक धर्मा लहामगे, यांच्यासह राजेगाव येथील गजानन उगले नवनाथ उगले, श्रीधन कोरडे, विठ्ठल उगले, वसंत कोरडे,भरत कोरडे तुकाराम  सपाटे,राजेंद्र थोरात, गुलाबराव सपाटे,आसाराम कोरडे,राजेंद्र उगले,भरत कोरडे, परमेश्वर टरले, भागवत उगले, नवनाथ सपाटे,किसन सपाटे शालेय समिती राजेगाव व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेगाव येथील  कल्याण वाघमारे, कैलास आरगडे, अमोल धांडगे, कसबे सर,श्रीमती घुले ,श्रीमती शेळके , पोषण आहार मदतनीस उगले,छाया देवडे, यांची उपस्थिती होती.

# नगर परिषद निवडणुकीनिमित्त जिल्हाधिकारी यांची अंबड येथे भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नगर परिषद निवडणुकच्या अनुषंगाने भेट दिली व निवडणूक प्रक्रियेविषयी आढावा घेतला. नगर परिषद कार्यालय अंबड येथे नगर परिषद निवडणुकीसाठी प्राप्त अर्जांची आज रोजी छाननी सुरू होती. जिल्हाधिकारी यांनी या सर्व प्रक्रियेची पाहणी केली.

यावेळी उप विभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी, तहसीलदार अंबड विजय चव्हाण यांच्या सह अन्य निवडणूक विषयक अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना दिल्या. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी उभारण्यात आलेले विविध कक्षांची त्यांनी पाहणी केली व नोडल अधिकारी यांना निवडणूक विषयक कामकाज चोखपणे पार पाडण्याबाबत निर्देश दिले.

जिल्हाधिकारी मित्तल यांनी निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यावर विशेष भर दिला. उमेदवार तसेच पक्ष कार्यकर्त्यांनी नियमांचे पालन करावे आणि प्रशासनाने कोणत्याही तक्रारींची तात्काळ दखल घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.या भेटीदरम्यान मतमोजणी कक्षाची व सुरक्षा कक्षाची पा-हणी केली व  मतदान केंद्रांची मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, कर्मचारी नियोजन, साहित्य उपलब्धता, संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांची स्थिती आदींचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. तसेच निवडणूक कालावधीत आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी सर्वांनी घ्यावी हे निर्दे श त्यांनी दिले.

# राजेवाडी शाळेतर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत जनजागृती फेरी







**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/जागर बदलाचा, समृद्ध महाराष्ट्राचा या संकल्पनेवर आधारित मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत बदनापूर तालुक्यातील राजेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतर्फे भव्य जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. गावातील नागरिकांना या अभियानाचे महत्व पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध घोषणाबाजी करत, फलक हा-तात घेऊन गावभर परिक्रमा केली.

फेरीदरम्यान स्वच्छता, साक्षरता, आरोग्य, ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन, तसेच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांबाबत माहिती देत ग्रामस्थांना जागरूक करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्त आणि संदेश देण्याची पद्धत पाहून गावकरीही कौतुकाने त्यांना पाठिंबा देत होते.

या उपक्रमामध्ये मुख्याध्यापक जगत घुगे यांनी अभियानाचे उद्दिष्ट सांगत ग्रामविकासात नागरिकांच्या सक्रीय सहभागाची गरज प्रतिपादन केली.

शालेय समितीचे अध्यक्ष रंजित शेजुळ मा सरपंच प्रता-पसिंग गुसिंगे उपाध्यक्ष प्रता-पसिंग डेहगंळ, सदस्य ज्योती घुणावत, ग्रामपंचायतचे ग्रामपंचयातअधिकारी श्रीमती मेहत्रे, तसेच गावातील मान्यवर नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. सहशिक्षक श्री परमेश्वर मोरे, श्रीमती वनिता आचार्य, श्रीमती गंगा टेपले, श्रीमती प्रज्ञा चौधरी, अंगणवाडी सेविका, आरोग्य विभागातील महिला कर्मचारी यांच्यासह ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने या फेरीत सहभागी झाले.

# अल्पवयीन प्रेमसंबंध आणि लग्न भोवले; 'पोक्सो' कायद्याचा दणका, पतीवरील गुन्हा रद्द करण्यास हायकोर्टाचा स्पष्ट नकार

## पौंगडावस्थेतील प्रेमसंबंधांना कायद्याचा चाप! पालकांनो, मुलामुलींना शाळेतच पोक्सो आणि बालविवाह कायद्याची माहिती देणे अत्यावश्यक...

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ आमचं प्रेम होतं, आम्ही लग्न केलं आणि आता आम्हाला एक बाळही आहे, असा युक्तिवाद करत अल्पवयीन पत्नीसोबतच्या लैंगिक संबंधांप्रकरणी दाखल झालेला गुन्हा रद्द करण्याची मागणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने फेटाळून लावली आहे. पौगंडावस्थेतील प्रेमसंबंध असले तरी कायद्याच्या नजरेत अल्पवयीन मुलीची संमती ही संमती मानली जात नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने आरोपी पतीला कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. हा निकाल म्हणजे पौगंडावस्थेतील मुले आणि त्यांच्या पालकांसाठी एक मोठा धडा आहे.

अकोला जिल्ह्यातील तेलहरा येथील राहणाऱ्या २९ वर्षीय मिर्झा असलम बेग याचे १७ वर्षीय मुलीसोबत प्रेमसंबंध होते. दोघांच्याही कुटुंबीयांच्या संमतीने २ जून २०२४ रोजी त्यांचे मुस्लिम रितीरिवाजांनुसार लग्न झाले. लग्नाच्या वेळी मुलगी अल्पवयीन होती. यानंतर, १० मे २०२५ रोजी तिने एका मुलाला जन्म दिला.

ही माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर, पोलीस हवालदार राहुल तायडे यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली. मुलीचे वय लग्नाच्या वेळी १८ वर्षांपेक्षा कमी असल्याने आणि तिच्यासोबत लैंगिक संबंध ठेवल्याने, पोलिसांनी आरोपी पती मिर्झा असलम बेग आणि त्याच्या कुटुंबातील इतर दोन सदस्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता (इछड), २०२३ चे कलम ६४(१) (पूर्वीचे भारतीय दंड संहिता , १८६० चे कलम ३७६ - बलात्कार), लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ चे कलम ४(१) आणि ८ आणि बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६ चे कलम ९, १०, ११ अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले.

### न्यायालयात काय घडले?

आरोपींनी त्यांच्यावरील हा गुन्हा (ऋखठ) रद्द करण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (इछडड), २०२३ अंतर्गत उच्च न्यायालयात धाव घेतली (पूर्वीची तरतूद फौजदारी प्रक्रिया संहिता (उीझउ), १९७३ चे कलम ४८२). आरोपींच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, हे पौगंडावस्थेतील प्रेमप्रकरण होते. दोघांनी लग्न केले असून ते आता शांततेत एकत्र राहत आहेत. त्यांना एक मूल आहे. जर पतीवर खटला चालवला गेला, तर पीडिता आणि तिच्या मुलाचे भविष्य उद्धस्त होईल. पीडित मुलीनेही वकिलामार्फत गुन्हा रद्द करण्यास हरकत नसल्याचे सांगितले.

मात्र, सरकारी वकिलांनी याला तीव्र विरोध केला. त्यांनी सांगितले की, घटनेच्या वेळी मुलगी अल्पवयीन होती आणि आरोपी २९ वर्षांचा होता. कायद्यानुसार, १८ वर्षांखालील मुलीने दिलेली संमती ग्राह्य धरली जात नाही. त्यामुळे हा एक गंभीर गुन्हा आहे.

न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे यांच्या खंडपीठाने दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर आरोपींची याचिका फेटाळून लाव-ली. न्यायालयाने स्पष्ट केले की: पोक्सो कायद्याचा उद्देश: पोक्सो कायद्याचा मुख्य उद्देश मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण करणे आहे.अल्पवयीन मुलीची संमती अवैध: कायद्यानुसार, १८ वर्षांखालील मुलीची लैंगिक संबंधांसाठी दिलेली संमती ही संमती मानली जात नाही. जरी प्रेमसंबंध असले तरी, कायदा याला गुन्हाच मान-तो.वयातील तफावत: आरोपी २९ वर्षांचा असून त्याला कायद्याची माहिती असणे अपेक्षित होते. अल्पवयीन मुलीसोबत लग्न आणि शारीरिक संबंध ठेवण्यापूर्वी त्याने तिच्या वयाचा विचार करायला हवा होता.

सर्वोच्च न्यायालयाचा संदर्भ: न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयातील एका प्रकरणाचा संदर्भ देत म्हटले की, जोपर्यंत पौगंडावस्थेतील प्रेमसंबंधांबाबत कायद्यात बदल होत नाही, तोपर्यंत सध्याच्या कायद्याचे पालन करणे बंधनकारक आहे.या कारणास्तव, न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास आणि गुन्हा रद्द करण्यास स्पष्ट नकार दिला.या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत म्हणाले, हा निकाल अत्यंत महत्त्वाचा आणि डोळे उघडणारा आहे. प्रेम आणि भावनांच्या भरात अनेक तरुण-तरुणी कायद्याचे उल्लंघन करतात, ज्याचे गंभीर परिणाम त्यांना आयुष्यभर भोगावे लागतात.

पोक्सो कायदा अत्यंत कडक आहे. त्यामुळे प्रत्येक शाळा, कॉलेज आणि शिकवणी वर्गांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा, लैंगिक संबंधांसाठी संमतीचे वय (१८ वर्षे) आणि बालविवाहाच्या दुष्परिणामांबद्दल सविस्तर माहिती दिली पाहिजे. पालकांनीही आपल्या मुलांशी या संवेदनशील विषयावर मोकळेपणाने बोलले पाहिजे. कायद्याचे अज्ञान हे बचावाचे कारण असू शकत नाही.या निकालाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, प्रेमसंबंध असले तरी अल्पवयीन मुलीसोबत शारीरिक संबंध ठेवणे हा गंभीर गुन्हा आहे आणि लग्न करून या गुन्ह्या-तून सुटका मिळू शकत नाही. त्यामुळे, पौगंडावस्थेतील मुला-मुलींनी आणि त्यांच्या पालकांनी अत्यंत सावध राहून कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे.

# वाणी कुटुंबीयांचा शिवसेनेला अखेर जय महाराष्ट्र!

## शिवसैनिकांसह केला भाजपमध्ये प्रवेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर प्रतिनिधी** / नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वैजापूर तालुक्यात मोठी राजकीय घडामोड घडली आहे. गेल्या काही दिवसांपासून वाणी कुटुंबीय काय भूमिका घेणार

याकडे वैजापूरकरांचे लक्ष लागून होते. अखेर हा सस्पेन्स आता मिटला आहे. दिवंगत माजी आमदार आर.एम.वाणी यांच्या कुटुंबीयांनी आपल्या कार्यकर्त्यांसह उ.बा.ठा सेनेला सोडचिठ्ठी देत मुंबई येथे मंगळवारी भाजपमध्ये प्रवेश केला.भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते व मंत्री अतुल सावे,खासदार भागवत कराड ,आमदार संजय केणेकर ,भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला.




वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देविदास वाणी, तालुकाप्रमुख सचिन वाणी, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश चव्हाण, माजी नगर-सेवक लिमेश (बापू) वाणी, अनिल पा.न्हावले,नंदकिशोर जाधव,ऋषिकेश राजपुत,रविंद्र मंडळ,संदिप त्रिभुवण,अमजद शेख,शिवाजी जाधव यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपाचे कमळ हाती घेतल्याने वैजापूर नगरपालिका निवडणुकीत अनेक प्रभागातील समीकरणे बदलणार आहेत.

यावेळी भाजपा जिल्हाउपाध्यक्ष अविनाश गलांडे, भाजप नेते कैलास पवार, जिल्हाउपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगताप, तालुकाध्यक्ष संदीप ठोंबरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

हे पत्रक  मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३,   संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे   मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813